

महिलांकडून बाजरीच्या पिकांची कटाई विविधता

अन्नधान्याच्या सार्वभौमत्वाकडे

गौण तृणधान्यावर आधारीत जैवविविधतेची शेती पध्दती

प्रशांत मोहंती

गौण तृणधान्याची पिके सकस अन्न देणारी, कणखर आणि हवामान, बदला संवेदनक्षम असतात. गेल्या काही वर्षापासून एकपीक पध्दती व सघन शेतीवर भर दिल्यामुळे हया पिकाखालील क्षेत्र घटु लागले आहे. कंधमाल येथील आदिवासी जमातींनी एकपीक पध्दतीचे बंधन तोडून गौण तृणधान्यावर आधारीत जैवविविधतेची शेती पध्दती अवलंबली आहे. सध्या ते जादा संवेदनक्षम आणि पर्यावरण सुलभ शेतीचा अवलंब करुन जादा प्रमाणात आणि अधिक सकस अन्न धान्य उत्पादीत करीत आहेत ते ही जैवविविधता सांभाळून

कुटीया कोंध ही आदिवासी जमात मुख्यत्वेकरुन ओडीसामधील कंधमाल जिल्हयाच्या तुमुदीबंध तहसिलीच्या सभोवतालच्या खेडयामध्ये राहते. दिर्घकालीन व दुरवर पसरलेल्या गरिबीने माखलेली कुटीया कोधं जमात टेकडयांच्या उतारावर (स्थानिक पोदुचासा नावाने ओळखतात) कोरडवाहु शेती आणि स्थलातरीत शेतीवर त्यांचे उदरनिर्वाह करतात. ते जंगलावर सुध्दा अवलंबुन असतात आणि जवळपास 15% वार्षिक उत्पन्न. हे जंगलातील गौण उपज गोळा करून त्यातून मिळवतात.

शेती व्यवसाय हा पारंपारीक उदरनिर्वाह

कुटीया कोंध जमातीजवळ मिश्र पीक पध्दतीचा भरघोस अनुभव आहे. ते मिश्र शेतीत 40-50 प्रजाती व पीकांची लागवड करतात.ही पध्दती 20-25 वर्षअगोदर सर्वत्र अस्तित्वात होती. हरीत क्रांतीच्या तंत्रज्ञानाच्या आधारे शासनाने धान लागवडीवर जबरदस्त प्रोत्साहन दिल्यानंतर शेतातील जैवविविधता, ज्यामध्ये गौण तृणधान्य व कडधान्य होते ते नाहीसे व्हावयास लागले. तसेच स्वस्त धान्य वितरण योजनेमध्ये सुध्दा तांदूळ प्रमुख धान्य झाल्यामुळे शेतकरी धान तादुंळ लागवडीकडे वळले.त्यामुळे इतर अन्न धान्याची निर्मिती घटली. सध्या परिस्थितीत फक्त 12-13 प्राकारच्या पिकांची हया प्रदेशात लागवड केली जाते.

स्थानिक जमातींना वर्षातील 200-210 दिवसासाठी आवश्यक लागणारे अन्नधान्य जबरदस्तीने विकत घ्यावे लागते. त्यामुळे त्यांना अन्नधान्याच्या आवश्यकतेसाठी स्थानिक सावकार आणि इतर स्त्रोतांवर अवलंबुन राहावे लागते. सर्वसाधारणपणे सरासरी प्रत्येक कुटुंबावर रु 2800 चे कर्ज आहे. मुख्यतः अन्नाची खरेदी करण्यासाठी कर्ज घेतले जाते. त्याकरीता मातीमोल किमतीत शेतीचा तुकडा (धान शेतीचा) जनावरे, पक्व फळांचे वृक्ष (जसे आंबा, फणस इ.) किंवा हळद व मोहरी . सारखी पीके गहाण ठेवावी लागत.

गुमा गावात सन 2011 मध्ये निर्माण या स्वंयसेवी संस्थेने गौण तृणधान्यावर अभ्यास केला. निर्माण ह्या संस्थेने 2011 पासून कंधमाल भागातील गौण तृणधान्यावर आधारीत पीक पध्दतीवर काम करत शाश्वत शेती , जैविक विविधतेचे संवर्धन आणि ग्रामीण उदरनिर्वाह या बाबीवर कार्य सुरू केले. अभ्यासाअंती असे निर्दशनास आले की गौण तृणधान्यावर आधारीत पीक पध्दतीची लागवड क्षेत्रात घट झाली असून त्याचा परिणाम कौटुबिंक अन्न व आहाराच्या सुरक्षितेवर झाला आहे. निर्माणा ने सखोल तपासणी केल्यानंतर असे आढळले की, गौण तृणधान्य पिके वाढत्या तापमानात व कमी आर्दतेत तग धरण्यास सक्षम असून सकस अन्न उत्पादीत करते म्हणुन निर्माणने गौण

गौण तृणधान्य पीक पध्दती पुर्नस्थापना पुर्नआगमनानंतर पीकांची विविधता 13 वरुन 25 वर गेली तसेच कुटुंबाची अन्न सुरक्षा 45 वरुन 60 दिवसांवर गेली. एकाच हंगामात अपूऱ्या बियाण्यापासून हि जमात बियाणामध्ये स्वालंबी झाली.



भरड धान्ये कणखर व पाण्याचा ताण सहन करणारी असतात

तृणधान्य पीक पध्दती पुन्हा कार्यान्वित होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. त्यासाठी शेतकऱ्यांची संघटना निर्माण करुन धोरण पातळीवरील बदलांसांठी प्रभाव टाकणे सुरु केले.

गौण तृणधान्य आधारीत जैवविविधतेची शेतीची पुर्नस्थापना

निर्माणने 14 खेडयातील 306 कुटुंबासोबत गाव बैठकी घेतल्या. अन्न व पोषणाची असुरक्षितता यासारख्या मुद्यावर आणि शेती पध्दतीत होणारा बदल याबाबत जमातीसोबत सांगोपांग चर्चा केली. त्यामुळे या जमातीला गौण तृणधान्य आधारीत शेती पध्दतीचे पुर्नजिवन करण्याची गरज भासू लागली. यामध्ये निर्माण मध्यस्थीचा मुख्य उद्देश होता की ग्रामीण स्तरावरील घटकांना अन्न उत्पादन यंत्रणेचा हक्क/ताबा मिळविणे सोपे गेले पाहीजे आणि चांगल्या राहणीमानासाठी बियाणे पतपेढी उभारणे, ज्ञानाची देवाणघेवाण होण्यासाठी अभ्यास वर्ग व सहली आयोजीत करणे. तसेच गौण तृणधान्य आधारीत शेतीपध्दतीचे पुर्नजीवन करणे. प्रत्येक खेडयात ग्रामीण स्तरावरील संघटना उभी केली. ती संस्था जमातीला किती बियाणे लागेल यांचा अंदाज घेऊन ते जमा करेल. या ग्रामीण संघटना गौण तृणधान्याच्या बियाणाच्या पतपेढी आणि त्याचे व्यवस्थापन करु लागल्या. खुल्या संकरण होणाऱ्या वाणांवर भर देऊन विशेषताः महीला शेतकऱ्याकडून बीज पैदास करण्यात आले. जमातीच्या गटांनी गौण तृणधान्य व कडधान्यांच्या बियाणांच्या आवश्यकतेचा आढावा घेतला. प्रारंभी निर्माणने 12 वाणांच्या बियाणांचा पुरवठा केला. नंतर हे बियाणे ग्रामीण स्तरावरील गटांना भांडवल म्हणून बियाणे पतपेढीकरीता वितरीत करुन त्यांची वाढ करणे आणि जमातीच्या बियाणांची आवश्यकता पुर्ण केली जाईल अशी त्यांच्यावर जबाबदारी दिली. हा कार्यक्रम राबविण्यासाठी स्त्रियांच्या बियाणे निवडणे व संग्रह करण्याच्या ज्ञानाचा वापर करुन महत्वाची भुमिका त्यांना दिली. बियांणांची निवड, कुटुंबाची आवश्यकता, बीयाणांची महीलांनी किंमत ठरविणे, जमा करणे आणि कुटुंबामध्ये वितरण करण्याच्या कामात महिलानी अग्रक्रमाने भाग घेतला. गाव स्तरावरील गटांच्या बैठकित जमातीने महिलांना कार्यालयीन अधिकारी जसे अध्यक्ष व सचिव म्हणून निवडले. एकाच हंगामात जवळपास 25 पिकांच्या वाणांचे पुनरुज्जीवन झाले. याप्रमाणे लागवडीचे वेळापत्रक वाढत गेले. आणि जमातीला अधिक उत्पादन मिळावयास लागले. अशा पध्दतीने सरतेशेवटी कौटुंबिक स्तरावर अन्न सुरक्षितता वाढत गेली.

जैवविविधतेचा उत्सव

पिकाच्या कापणीनंतर कुटीया कोंध ही जमात गाव पातळीवर बुरलांग यात्रा उत्सव म्हणून साजरा करते. निर्माणने या उत्सवाला गावपातळीवर मदत केली. विविध खेंडयामधील लोंकामध्ये एकजुट निर्माण होण्यासाठी प्रथमच ग्राम पंचायतीच्या स्तरावर बुरलांग यात्रा आयोजीत करण्यात आली. या उत्सवाचा उपयोग शेतातील जैवविविधतेचे पुनरुज्जीवन करण्याची संधी, स्थानिक बियाणे शेती पध्दती आणि त्यांच्या जीवनमानाचे प्रदर्शन इ.साठी करण्यात आला. जमातीकडून स्थानीक बियाण्यांचे संवर्धन, शेती पध्दती आणि पीक वैविधता कशी अन्न व पोषण सुरक्षीतत सुधारता येऊ शकते याचे प्रमाणीक पणे प्रदर्शन केले. बियाणे प्रदर्शनात जमातीकडून लागवड केलेल्या गौण तृणधान्य, कडधान्य, धान, गळीतधान्य आणि भाजीपाला इत्यादींचा समावेश होता. त्यात बियाण्याची, अनुभवाची आणि कृषी पध्दतीच्या ज्ञानाची देवाणघेवाण झाली. त्या उत्सवात राज्यातील इतर भागातील तसेच शेजारच्या राज्यातील जसे आंध्रप्रदेशातील शेतकऱ्यांना भाग घेतला. गुमा ग्रामपचांयतीतील शेतकऱ्यांनी गौण तृणधान्य मिश्रीत पीक पध्दतीने कसे अन्न व पोषणाची सुरक्षा प्राप्त केली याचा भरपुर अनुभव इतराना सांगितला. या जमातीने ही संधी संबंधीत जनमानसाच्या विचारसरणीवर प्रभाव टाकण्यासाठी उपयोगात आणली. शाळेतील व आंगणवाडीतील दुपारच्या जेवणात सर्वांना गौण तृणधान्य अत्यंत आवश्यक आहे याची जाणीव करुन दिली.

फायदे आणि भविष्यातील मार्ग

गौण तृणधान्यावर आधारीत शेती पध्दतीमुळे 14 खेडयातील शेतात पीक विविधता 13 वरुन 25 वर पोहोचली आणी अन्नाच्या विविधतेमध्ये वाढ झाली. कौटुंबिक पातळीवर 45 ते 60 दिवसापर्यंत अन्नाची सुरक्षितता वाढली. एकाच हंगामात बीयाणाची कमतरता भासणारी ही जमात बीयाण्याच्या बाबतीत स्ववलंबी झाली. महत्वाची बाब म्हणजे पिकाच्या विविधतेच्या ऱ्हासासोबत वाहून गेलेले परंपरागत ज्ञान पुर्नस्थापित झाले. भविष्यात सहभागीय हमी पध्दतीअंतर्गत सेंद्रीय प्रमाणीककरण मुल्यवर्धन, बाजार साखळी, आणि महीला सक्षमीकरण यांच्या एकात्मिकरीत्या अंमलासाठी योजना तयार केली आहे. मानवी व पर्यावरणाच्या आरोग्यावर विविध अंगी चांगला परिणाम होण्यासाठी सुध्दा गैाण तृणधान्य आधारीत शेती पध्दतीचा विस्तार असे विशेष प्रयत्न करण्यात आले. प्रसाराचे साहीत्य निर्माण करुन वितरण करण्यात आले. गौण तृणधान्य व पीक विविधता याचेवर भर देणारी कृषक समाज या नावाची वृतपत्रिका सुरु करण्यात आली. निर्माणने तयार केलेल्या मॉडेल द्वारे आज शेती विषयक अडचणी सोडवणुकीचे सुत्र देऊन कंधमाल जिल्हयातील समउष्ण प्रदेशातील जमातीच्या अन्न व पोषणाची आवश्यकता पुर्ण होऊ शकली असा पर्याय दिला. हया मॉडेल मध्ये असमतोल पाऊसमान व हवामान बदलाला आत्मसात करण्याची ताकद असुन शेती पध्दती पुर्ववत होण्यास सक्षमता वाढीस लागली. दुसऱ्या वर्षी या प्रयोगाचा विस्तार 37 खेडयातील 445 कुटुंबापर्यत वाढविण्यात आला. अंगवाडीतील मधान्न भोजनात गौण तृणधान्याचा समावेश करण्यात प्रयत्न करण्याचा आला. सरकारी अधिकाऱ्यांसोबत, विचारवंतासोबत आणि प्रसार माध्यमासोबत कृतीशील राहून ध्येय साधण्यासाठी प्रयत्न सुरु आहे.

ऋणनिर्देशः

निर्माण विनम्रपणे ॲक्शन ऐड आणि भारतीय गौण तृणधान्य नेटवर्कचे दिलेल्या सहकार्याव मदतीमुळे गौण तृणधान्य आधारीत शेती पध्दतीचे पुनरुज्जीवन करु शकल्या बद्दल धन्यवाद देते.

प्रशांत मोहंती

निर्माणचे कार्यकर्ता, एस-3/751, निलांद्री विहार,
पो. सैलाश्री विहार, भुवनेश्वर - 751021, ओडीसा
email : prasantmohanty@gmail.com

मराठी अनुवाद : डॉ. विनोद खडसे.

Source : Towards food sovereignty Millets based bio-diverse Farming System LEISA India,Vol. 16 No.1, March, 2014